महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

Rs.2/- मुख्य संपादक : रविंद्र घोडविंदे ■ कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

मंगळवार ■ २६ ऑगस्ट २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक ०६५ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

# प्रभागरचनेवर हरकती घेण्यास पुरेसा वेळ नाही

## सर्व राजकीय पक्षांची नाराजी




दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण, ता. २५ (वार्ताहर):** आगामी पालिका निवडणुकीसाठी १२२ प्रभागांच्या ३१ पॅनेलचा प्रारूप प्रभाग आराखडा शुक्रवारी (ता. २२) रात्री जाहीर करण्यात आला; मात्र या प्रारूप प्रभागरचनेवर हरकती घेण्यासाठी फक्त १३ दिवसांचा कालावधी देण्यात आला असून, हरकतींसाठी वेळ पुरेसा नसल्याचा आरोप करण्यात येत आहे. गणपती उत्सवाच्या काळात हरकत घेण्याचा कालावधी देण्यात आल्यामुळे सरकारने लोकांच्या सहभागाला अडथळा निर्माण केल्याचा आरोप काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस ॲड. नवीन सिंग यांनी केला आहे. त्यांनी या वेळेची त्वरित वाढ करून हरकत घेण्याचा कालावधी वाढवावा अन्यथा, काँग्रेसतर्फे आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

कल्याण डोंबिवली महापालिकेच्या निवडणुका प्रथमच बहुसदस्यीय प्रभाग पद्धतीने घेतल्या जाणार आहेत. यासाठी १२२ प्रभागांसाठी चार सदस्यीय पॅनेल तयार केले असून, चार प्रभागांसाठी २९ पॅनेल आणि तीन प्रभागांसाठी दोन पॅनेल म्हणजे एकूण ३१ प्रभाग पॅनेल जाहीर केले आहेत. या प्रभागरचनेवर हरकत घेण्यासाठी ४ सप्टेंबरपर्यंत म्हणजे १३ दिवसांचा कालावधी देण्यात आला आहे. ॲड. नवीन सिंग म्हणाले, "महायुती सरकारने प्रभागरचना आपल्या पक्षाच्या हितासाठी तयार केली असल्याचा भास होतो. लोकांना हरकत घेण्यासाठी पुरेसा वेळ देण्यात

> **गणपती उत्सवाच्या काळात हरकत घेण्याचा कालावधी देण्यात आल्यामुळे सरकारने लोकांच्या सहभागाला अडथळा निर्माण झाला आहे**
>
> • ॲड. नवीन सिंग
> महाराष्ट्र काँग्रेस प्रदेश सरचिटणीस

आलेला नाही. गणपती उत्सवाच्या काळात लोकांच्या घरी बाप्पाचे आगमन असल्याने लोक हरकत घेण्यात अपयशी ठरतील. त्यामुळे शासनाने वेळ वाढवून द्यावा." सरकारने आपली मागणी नाकारल्यास काँग्रेसकडून आंदोलन करण्याची तयारी असल्याचे स्पष्ट केले आहे. कल्याण-डोंबिवली महापालिकेची मुदत २०२० मध्ये संपली असून, कोरोनामुळे निवडणुका होऊ न शकल्याने पाच वर्षापासून पालिकेवर प्रशासकीय राजवट आहे.

यंदाची आगामी पालिका निवडणुका प्रथमच बहुसदस्यीय पॅनेल पद्धतीने घेतली जाणार आहे. चार प्रभागांचा एक पॅनेल असल्याने सर्वच राजकीय पक्षासह इच्छुक उमेदवारांना प्रभागाची रचना कशी असणार असून, कोणकोणते चार प्रभाग एकमेकांना जोडून पॅनेल तयार केला आहे, याची उत्कंठा लागली आहे. या प्रभागरचनेवर ४ सप्टेंबर २०२५पर्यंत पालिका आयुक्तांकडे नगरपालिकेत हरकती आणि सूचना नोंदवता येणार असून, त्यावर सुनावणी होऊन त्यानंतर अंतिम आराखडा जाहीर होण्याची शक्यता आहे. ऑनलाइन व पालिका संकेतस्थळावर हरकती व सूचना स्वीकारल्या जाणार नसून प्रभागांच्या भौगोलिक सीमाची प्रारूप अधिसूचना व प्रभागांच्या सीमा दर्शविणारे नकाशे कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या पाहण्यासाठी प्रभाग कार्यालय १-अ, २-व, ३-क, ४-जे, ५-ड, ६-फ, ७-ह, ८-ग, ९-आय, १०-ई या ठिकाणी, तसेच कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, मुख्यालय शंकरराव चौक, कल्याण पश्चिम येथे उपलब्ध करण्यात आले आहेत.






# कॉमन वेल्थ स्पर्धेत जीवनदीप कॉलेजच्या सोमय्या दळवीला सुवर्ण पदक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** जीवनदीप महाविद्यालय गोवेलीच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा, आपल्या महाविद्यालयातील टी.वाय.बीए या वर्गात शिकत असलेली कु. सौम्या दळवी हिने अहमदाबाद येथे चालू असलेल्या कॉमनवेल्थ वेटलिफ्टिंग चॅम्पियनशिप मध्ये 48 किलो वजनी गटात(ज्युनियर)भारतासाठी सुवर्णपदकाची कमाई केली. तिच्या या कामगिरीबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्री.रवींद्र घोडविंदे सर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अशोक वाघ महाविद्यालयाचे संचालक श्री.प्रशांत घोडविंदे यांनी तिच्या या कामगिरीबद्दल तिचे अभिनंदन केले त्याचप्रमाणे तिच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# माणकोली पूल चार दिवस बंद

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली** - डोंबिवली मोठागाव येथील माणकोली उड्डाण पूल गणपती विसर्जनाच्या चार दिवसांच्या कालावधीत दुपारी १२ ते रात्री गणपती विसर्जन होईपर्यंत बंद ठेवण्याचा निर्णय वाहतूक विभागाने घेतला आहे. या कालावधीत माणकोली उड्डाण पूल मार्गे होणारी वाहतूक पर्यायी मार्गाने वळविण्यात येणार आहे, अशी माहिती डोंबिवली वाहतूक विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीराम पाटील यांनी दिली. या वाहतूक बदलाची अधिसूचना वाहतूक विभागाचे उपायुक्त पंकज शिरसाट यांनी काढली आहे. २८ ऑगस्ट, ३१ ऑगस्ट, २ सप्टेंबर आणि ६ सप्टेंबर या दिवशी पूल वाहतुकीसाठी बंद असणार आहे. डोंबिवलीतील गणेश भक्त गणपती विसर्जनासाठी अनेक वर्षापासून मोठागाव रेतीबंदर खाडी किनारच्या गणेशघाटाला पसंती देतात.

# सहा फुटांच्या मूर्तींचे विसर्जन कृत्रिम तलावातच

## पालिका आयुक्त सौरभ राव



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे - ठाणे शहरातील तलाव प्रदुषित होऊ नयेत यासाठी ठाणे महापालिकेकडून गेल्या काही वर्षांपासून कृत्रिम तलाव तयार करण्यात येत आहे. या पर्यावरणपूरक विसर्जन व्यवस्थेस नागरिकांकडून चांगला प्रतिसाद मिळतो. यंदाही पालिकेने अशीच व्यवस्था गणेश मूर्ती विसर्जनासाठी उभारली असून त्यात गेल्यावर्षी पेक्षा यंदा विसर्जन व्यवस्थेत दिड पट वाढ करण्यात आली आहे. उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे सहा फुटांपर्यंतच्या सर्व गणेश मूर्तींचे विसर्जन केवळ कृत्रिम तलावात करण्यात येणार आहे. तर, सहा फुटांपेक्षा जास्त उंचीच्या मूर्ती नैसर्गिक जलस्रोतात विसर्जित करता येणार आहे.

ठाणे महापालिका क्षेत्रात कृत्रिम तलाव आणि फिरत्या विसर्जन व्यवस्थेत वाढ करण्यात आली आहे. गेल्यावर्षी पेक्षा दीड पट जास्तीची विसर्जन व्यवस्था केली आहे. यंदा २३ कृत्रिम तलाव, ७७ टाकी विसर्जन व्यवस्था, १५ फिरती विसर्जन केंद्र, ९ खाडी घाट विसर्जन व्यवस्था आणि १० मूर्ती स्वीकृती केंद्र अशा एकूण १३४ ठिकाणी विसर्जन व्यवस्था करण्यात आली आहे. खाडी घाट येथे केवळ ६ फूटाच्या वरील गणेशमूर्त्यांचे विसर्जन केले जाईल, अशी माहिती महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी दिली आहे.

ठाणे महापालिका क्षेत्रात कृत्रिम तलाव आणि फिरत्या विसर्जन व्यवस्थेत वाढ करण्यात आली आहे. गेल्यावर्षी पेक्षा दीड पट जास्तीची विसर्जन व्यवस्था केली आहे. यंदा २३ कृत्रिम तलाव, ७७ टाकी विसर्जन व्यवस्था, १५ फिरती विसर्जन केंद्र, ९ खाडी घाट विसर्जन व्यवस्था आणि १० मूर्ती स्वीकृती केंद्र अशा एकूण १३४ ठिकाणी विसर्जन व्यवस्था करण्यात आली आहे. खाडी घाट येथे केवळ ६ फूटाच्या वरील गणेशमूर्त्यांचे विसर्जन केले जाईल, अशी माहिती महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी दिली आहे.

# भाजप मुंबई अध्यक्षपदी अमित साटम

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई महापालिका जिंकायचीच, असा चंग बांधलेल्या भाजपने मुंबईत संघटनात्मक बदल केले आहेत. भाजप मंत्री आशिष शेलार यांच्याकडे असलेली मुंबईच्या संघटनेची जबाबदारी होती. परंतु आगामी महापालिका निवडणुकीमुळे संघटनेच्या विस्तारासाठी कोअर कमिटी आणि वरिष्ठांनी आमदार साटम यांच्याकडे मुंबई शहराध्यक्षपदाची जबाबदारी सोपवण्यात आली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांच्या उपस्थितीत आमदार साटम यांनी पदाची सूत्र स्वीकारली. मुख्यमंत्री फडणवीस यांनी कोणत्याही महायुती मुंबई जिंकणारच, असा पुनरुच्चार केला. 'आमदार साटम तीनवेळा आमदार अन् नगरसेवक म्हणून देखील काम केलं आहे. भाजपमध्ये प्रदीर्घ असा कार्यकाळ त्यांनी घालवला आहे. संघटनात्मक अनेक जबाबदाऱ्या सांभाळल्या आहेत. विधानसभेत एक अभ्यासू अन् आक्रमक, असा प्रकारचे आमदार म्हणून त्यांची प्रतिमा आहे. मुंबईच्या समस्यांची जाण, तो सोडविण्यासाठी कल्पकता त्यांच्याकडे आहे. येत्या काळात त्यांच्या नेतृत्वात भाजपमध्ये मुंबईमध्ये घोडदौड राखेल,' असा विश्वासही मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला.



**"आशिष शेलार, मंगलप्रभात लोढा यांनी मुंबईत पक्ष संघटनेची चांगली धुरा संभाळली. विधानसभा निवडणुकीत मंत्री आशिष शेलार यांनी भाजप मुंबईतील नंबरचा एक पक्ष केला. आशिष शेलार यांच्याकडे आा मंत्रिपदाचा भार आहे. त्यामुळे कोअर कमिटी सदस्य आणि वरिष्ठांची चर्चा करून आमदार अमित साटम यांच्याकडे मुंबईतील संघटनेची जबाबदारी दिली." • मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

# लाडकी बहीण योजनेत बोगस लाभार्थ्यांचा सुळसुळाट

## राज्यभरात २६ लाख ३४ हजार 'बोगस बहिणींनी सरकारचे कोट्यवधी लाटले

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** 'मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण' योजनेचा गैरफायदा उठविणाऱ्यांविरोधात सरकारने राबविलेल्या शोधमोहिमेमध्ये काही ज्येष्ठ मंत्र्यांच्या जिल्हयात सर्वाधिक बोगस लाभार्थी आढळून आले. त्यामुळे राज्यभरातील सर्व पात्र 'लाडक्या बहिणीं'ची पुन्हा ई-केवायसी पद्धतीने पडताळणी करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. राज्यभरात २६ लाख ३४ हजार बोगस 'लाडक्या बहिणींनी दरमहा दीड हजारांचा निधी घेऊन सरकारची फसवणूक केली.

राज्य सरकारच्या महत्त्वाकांक्षी 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' या योजनेत २ कोटी ६३ लाख लाडक्या बहिणींनी नोंदणी केली. त्यापैकी २ कोटी ४१ लाख महिला पात्र ठरल्या. विधानसभा निवडणुकीनंतर उर्वरित ११ लाख अर्जाची पात्रता तपासण्यात आल्यानंतर त्यात ७ लाख ७६ हजार अर्ज छाननीत बाद ठरले. जून महिन्यात सरकारने या योजनेचा आढावा घेण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार महिला व बालकल्याण विभागाने या योजनेतील सर्व पात्र लाभार्थींची ओळख पटविण्यासाठी सरकारच्या सर्व विभ ाग ाक ड ून म ाहित ी म ाग विल ी होती.




या २६ लाख ३४ हजार बोगस 'लाडक्या बहिणीं मध्ये शहरी भागातच सरकारची मोठ्या प्रमाणात फसवणूक झाल्याचे दिसून येते. 'लोकसत्ता'ला उपलब्ध तपशिलानुसार, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पुणे जिल्ह्यात सर्वाधिक २ लाख ४ हजार बोगस लाडक्या बहिणी आढळून आल्या आहेत. तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ठाणे जिल्ह्यात १ लाख, २५ हजार ३००, जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अहिल्यानगर जिल्ह्यात एक लाख २५ हजार ७५६, छगन भुजबळ, दादा भुसे, माणिकराव कोकाटे आणि नरहरी झिरवळ हे म ंत्रीप द भूषविणाऱ्या न ाशिक जिल्ह्यात एक लाख, ८६ हजार ८००, सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांच्या छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात एक लाख, ४ हजार ७००, वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ आणि आरोग्यमंत्री प्रकाश आबीटकर यांच्या कोल्हापूर जिल्ह्यात एक लाख १४०० तर सांस्कृतिक कार्यमंत्री आशीष शेलार यांच्या मुंबई उपनगर जिल्ह्यात एक लाख १३ हजार अपात्र म्हणजेच बोगस लाभार्थी आढळून आले आहेत.








## गीतासार

### अध्याय १८
### मोक्षसंन्यासयोगः

व्यास प्रसादाच्छुत वानेत द्‌गुह्यमहं परम् । योगं योगेश्वरा त्कृष्णा त्साक्षात्क थयतः स्वयम्
॥ १८-७५ ॥

श्रीव्यासांच्या कृपेने दिव्य दृष्टी मिळवून मी हा परम गोपनीय योग अर्जुनाला सांगत असताना स्वतः योगेश्वर भगवान श्रीकृष्णांकडून प्रत्यक्ष ऐकला आहे. ॥ १८-७५ ॥

राजन्संस्मृत्य संस्मृत्य संवादमि ममद्भुतम् । केशवार्जुनयोः पुण्यं हृष्यामि च मुहुर्मुहुः ॥ १८-७६ ॥

हे महाराज (धृतराष्ट्र), भगवान केशव (अर्थात श्रीकृष्ण) आणि अर्जुन यांचा हा रहस्यमय, कल्याणकारक आणि अद्‌भुत संवाद पुन्हा पुन्हा आठवून मी वारंवार आनंदित होत आहे.
॥ १८-७६ ॥

तच्च संस्मृत्य संस्मृत्य रूपमत्यद्भुतं हरेः । विस्मयो मे महान् राजन्हृष्यामि च पुनः पुनः ॥ १८-७७ ॥

हे महाराज (धृतराष्ट्र), श्रीहरीचे ते अत्यंत अलौकिक रूपही वरचेवर आठवून माझ्या मनाला खूप आश्चर्य वाटत आहे आणि मी वारंवार हर्षपुलकित होत आहे. ॥ १८-७७ ॥

## रेसिपी
## राजगिरा लाडू



साहित्य-
१०० ग्रॅम -राजगिरा
२०० ग्रॅम -गूळ
एक टीस्पून- तूप

कृती-
सर्वात आधी एका पॅनमध्ये राजगिरा फोडून घ्या. आता एका पॅनमध्ये तूप गरम करा आणि त्यात गूळ घाला आणि ते वितळा. तसेच आता एक पाक बनवा. आता पाकात राजगिरा घाला आणि मिसळा व हातावर पाणी लावा आणि थोडे मिश्रण घ्या आणि लाडू बनवा. तर चला तयार आहे आपले हरतालिका विशेष राजगिरा लाडू रेसिपी.

## कांद्याची साल : रोपांसाठी उत्तम खत



अनेकांना घरच्या घरी बाग फुलवण्याची इच्छा होते. शहरांमध्ये जागा कमी असली तरी, बाल्कनीमध्ये, टेरेसवर किंवा खिडकीच्या कडेला कुंड्या लावून आपली छोटीशी हिरवीगार बाग तयार करणं आता खूप सोपं झालं आहे. पण बागेची निगा राखणं म्हणजे खूप खर्चिक काम, असं अनेकांना वाटतं. बागेसाठी विशेष खतं आणणं, किटकनाशकं वापरणं यासाठी चांगलाच पैसा जातो.मात्र, तुमच्या घरातल्या एका साध्या पदार्थांचा वापर करून तुम्ही तुमची बाग अगदी कमी खर्चात आणि सहज सुंदर करू शकता. ती गोष्ट म्हणजे कांद्याची साल! हो, आपण रोज कचरा समजून फेकून देतो ते कांद्याचे साल तुमच्या रोपांसाठी एक उत्तम खत आणि नैसर्गिक कीटकनाशक म्हणून काम करते.

**कांद्याच्या सालीचे फायदे** : कांद्याच्या सालीमध्ये पोटॅशियम , कॅल्शियम , लोह आणि मॅग्नेशियम असे अनेक महत्त्वाचे पोषक घटक असतात. हे घटक रोपांच्या वाढीसाठी, फुलांसाठी आणि फळांसाठी खूप महत्त्वाचे असतात. या घटकांमुळे रोपांची मुळं मजबूत होतात आणि त्यांना रोगांपासून संरक्षण मिळते.

**घरी खत कसं बनवायचं?**
कांद्याच्या सालीपासून खत बनवणं खूप सोपं आहे. यासाठी तुम्हाला फक्त काही सोप्या स्टेप्स फॉलो कराव्या लागतील. एका भांड्यात कांद्याच्या साली घ्या आणि त्यात पाणी घाला. हे मिश्रण २४ ते ४८ तास तसेच ठेवा. त्यानंतर ते पाणी गाळून घ्या. गाळलेले हे पाणी तुम्ही थेट रोपांच्या मुळाशी घालू शकता.

## वाचक मनोगत
## गरज : एक विभाग, एक गणपतीची

सध्या नव्हे पूर्वीपासून काही, काही विशेष गावांमध्ये 'एक गाव एक गणपती' अशा प्रकारचा अतिशय चांगला उपक्रम राबवण्याची चांगली प्रथा सुरू आहे, अशाचप्रकारे मुंबई असो की उपनगरे त्यांनी एक विभाग एक गणपती असा उपक्रम राबवला तर पैशाची बचत होईलच त्याचबरोबर उत्सवाच्या माध्यमातून जमा होणारा पैसा विधायक कार्याकरीता वापरता येईल, तसेच कायदा व सुव्यवस्था चांगल्या प्रकारे राबवणे देखील पोलिसांना शक्य होईल, एका विभागात किती गणेशोत्सव मंडळे असावीत, त्यांच्याकडून नक्की कशा प्रकारचे समाज प्रबोधन होत आहे; हे पाहण्याबाबत कोणते नियंत्रण नाही. त्यामुळे सर्व राजकीय पक्षांचे कार्यकर्ते राजकीय अथवा अन्य महत्वकांक्षी एकाच विभागात स्वतंत्र गणेशोत्सव मंडळे स्थापन करून उत्सव साजरा करतात पण याचा भुर्दंड मात्र वर्गणी रूपाने सामान्य नागरिक आणि व्यापारी यांना भोगाव लागत आहे सध्या अनेक गणेशोत्सव मंडळे अतिशय थाटामाटात लाखो रुपये खर्च करून गणेश उत्सव साजरा करतात पण या रकमेपैकी किती विधायक कामासाठी वापरतात हा मोठा प्रश्न आहे काही गणेशोत्सव मंडळांनी पर्यावरण विषयक अनेक महत्त्वाचे मुद्दे वायू प्रदूषण, ध्वनी प्रदूषण, दिवसेंदिवस वाढणारी लोक संख्या, समुद्रकिनाऱ्यालगतचे आक्रमण आदींमुळे पर्यावरणाचा समतोल ढळू लागला आहे, त्यातच दिवसेंदिवस गणेशोत्सव साजरा करणाऱ्या मंडळाची वाढत जाणारी संख्या, गणेश मूर्तींची वाढत जाणारी उंची याचा परिणाम समुद्रात अथवा विविध ठिकाणी खाडीमध्ये या विसर्जनामुळे होणारे प्रदुषण. उत्सव काळात होणारे ध्वनी प्रदूषण, वाहतूक व्यवस्थेवर पडणारा ताण आदींची भर पडत आहे. वायु प्रदूषण आणि ध्वनी प्रदूषण हे तर आजचे महत्त्वाचे विषय आहेत पण उत्सव नक्की कशाप्रकारे साजरा करावा. याची दखल मात्र जनतेच्या न्यायालयाने घेणे सध्या परिस्थितीत आवश्यक झालेले आहे.

- सुनिल इंगळे, सामाजिक कार्यकर्ता, कल्याण.

## मोनिका महिला पतसंस्थेची सर्वसाधारण सभा संपन्न




दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ओतूर : ओतूरच्या महिलांच्या आर्थिक सबलीकरणासाठी कार्यरत असलेली मोनिका महिला नागरी सहकारी पतसंस्था मर्या ओतूर हिची ९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवारी (दि. २०) उत्साहपूर्ण आणि खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. संस्थेच्या अध्यक्षा निलिमाताई संभाजी तांबे यांच्या अध्यक्षतेखाली सभा पार पडली.

सभेच्या प्रारंभी सचिव मोनिका शहा यांनी वार्षिक अहवाल सादर केला. उपाध्यक्षा ललिता शेटे, संचालिका अश्विनी ढमाले, संगिता काळे, मंगल खेत्री, रोहिणी बावबंदे, रंजना डुबरे, विमल पानसरे, सुरेखा फापाळे, छाया तांबे, वृषाली डुबरे, वैशाली बोचरे, रेश्मा भले, वैशाली ठिकेकर यांसह संचालक मंडळातील सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मोनिका महिला नागरी पतसंस्थेचे कार्यक्षेत्र संपूर्ण जुन्नर तालुका असून संस्थेचे एकूण अ वर्ग सभासद १,९१७ आहेत. संस्थेचे अधिकृत भागभांडवल १ कोटी असून वसुल भागभांडवल ४३ लाख ६७ हजार रुपये इतके आहे. संस्थेच्या ठेवी तब्बल ५ कोटी ३८ लाख १८ हजार ६५५ रुपये असून गुंतवणूक १ कोटी ८० लाख ९१ हजार ४७९ रुपये आहे. सध्या संस्थेचे ठेवीदार १,८७९ असून संस्थेची प्रगती समाधानकारक मार्गावर असल्याचे दिसून आले.

संस्थेच्या अध्यक्षा निलिमाताई तांबे यांनी अध्यक्षीय मनोगतात सांगितले की, संस्थेचे संस्थापक संभाजी विठ्ठलराव तांबे यांनी ओतूरच्या पुण्यभूमीत प्रथमच महिलांसाठी पतसंस्था स्थापन केली आणि त्याला महिलांनी मोठा प्रतिसाद दिला. महिलांसाठी कर्ज वितरण व ठेवीची उत्तम सेवा पुरवून संस्थेने महिला सबलीकरणाचा आदर्श घालून दिला आहे, असे त्या म्हणाल्या. सभेचे सुत्रसंचालन जयराम तांबे यांनी केले. आभार प्रदर्शन मुख्य कार्यकारी अधिकारी शुभागी मुरादे यांनी केले.




## हरितालिका व्रताची कहाणी



देशाच्या अनेक राज्यांत हरितालिका व्रत साजरे केले जाते. भाद्रपद तृतीयेला केले जाणारे हे व्रत या वर्षी आज मंगळवारी 26 ऑगस्ट 2025 रोजी केले जाईल. हरितालिका व्रताच्या पूजेनंतर कहाणी वाचली किंवा ऐकली जाते, तर ज्यांचे पूजेला जाणे जमत नाही त्यांनी वाचा हरितालिका व्रत कथा.

कुमारिका आणि महिला हे व्रत करतात. हरितालिका कथा ही भविष्य पुराणातील हरगौरीसंवादात आली आहे. देशाच्या अनेक राज्यांत हरितालिका व्रत साजरे केले जाते. भाद्रपद तृतीयेला केले जाणारे हे व्रत या वर्षी मंगळवारी 26 ऑगस्ट 2025 रोजी केले जाईल. या दिवशी सकाळी स्त्रिया लवकर उठून स्नानादी करून नवे कोरे वस्त्र परिधान करतात. साज श्रृगांर करतात. पूजेसाठी चौपाटावर केळयाच्या पानांचा मंडप करून त्यात वाळूचे शिवपिंड करतात किंवा शिव पार्वतीची प्रतीमा ठेवतात. यावेळी सुहागिनीचा सर्व सामान चढवला जातो. रात्री जागरण करून स्त्रिया खेळ खेळतात, गाणी म्हणतात किंवा भजन किर्तन करतात. शेवटी कथा ऐकली जाते आणि आरती म्हणतात.

एके दिवशी शंकरपार्वती कैलास पर्वतावर बसले होते. पार्वतीनं शंकराला विचारलं, "महाराज, सर्व व्रतात चांगलं व्रत कोणतं? श्रम थोडे आणि फळ पुष्कळ, असं एखादं व्रत असलं, तर मला सांगा आणि मी कोणत्या पुण्याईनं आपल्या पदरी पडले हेही मला सांगा." तेव्हा शंकर म्हणाले, "जसा नक्षत्रात चंद्र श्रेष्ठ, ग्रहात सूर्य श्रेष्ठ, चार वर्णात ब्राह्मण श्रेष्ठ, देवात विष्णु श्रेष्ठ, नद्यांत गंगा श्रेष्ठ, त्याप्रमाणं हरितालिका हे व्रत सर्वात श्रेष्ठ आहे ते तुला सांगतो. तेच तू पूर्वजन्मी हिमालय पर्वतावर केलंस आणि त्याच पुण्यानं तू मला प्राप्त झालीस ते ऐक. हे व्रत भाद्रप्रद महिन्यातला पहिल्या तृतीयेला करावं. तू लहानपणी 'मी तुला प्राप्त व्हावे' म्हणून मोठं तप केलंस. चौसष्ट वर्षे तर झाडाची पिकलेली पानं खाऊन होतीस. थंडी, पाऊस, ऊन ही तिन्ही दुःख सहन केलीस. हे तुझे श्रम पाहून तूझ्या वडिलांना फार दुःख आणि 'अशी कन्या कोणास द्यावी?' अशी त्याला चिंता पडली. इतक्यात तिथं नारदमुनी आले. हिमालयानं त्यांची पूजा व येण्याचं कारण विचारलं. तेव्हा नारद म्हणाले, "तुझी कन्या उपवर झाली आहे, ती विष्णूला द्यावी. तो तिच्यायोग्य नवरा आहे. त्यांनीच मला तुजकडे मागणी करण्यास पाठविलं आहे. म्हणून इथं मी आलो आहे."

## रायगड जिल्हा न्यायालयात राष्ट्रीय लोक अदालत

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

रायगड : महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, उच्च न्यायालय, मुंबई यांच्या आदेशावरून संपूर्ण रायगड जिल्ह्यामध्ये दि. 13 सप्टेंबर 2025 रोजी राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे, असे वरिष्ठ दिवाणी न्यायाधीश तथा सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड-अलिबाग श्रीमती तेजस्विनी निराळे यांनी कळविले आहे. या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये रायगड जिल्हयातील सर्व न्यायालयात प्रलंबित असलेली दिवाणी व तडजोडपात्र फौजदारी प्रकरणे, दिवाणी व तडजोडपात्र फौजदारी अपिले, मोटार अपघात प्रकरणे, विवाह विषयक प्रलंबित प्रकरणे तसेच ग्रामपंचायत यांच्या कडील घरपट्टी, पाणीपट्टी बिलाच्या देयकाबाबतची वादपूर्व प्रकरणे, भारत दूर संचार निगम लिमिटेड, विजवितरण, राष्ट्रीयकृत बँका आणि पतसंस्था व इतर वित्तीय संस्था यांच्याकडील थकबाकीबाबतची वादपूर्व प्रकरणे या लोक अदालतीमध्ये तडजोडीसाठी ठेवण्यात येतात. तरी दि.13 सप्टेंबर 2025 रोजी होणाऱ्या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये जास्तीत जास्त प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्यासाठी सहकार्य करावे आणि या लोक अदालतीचा जास्तीत जास्त नागरीकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड-अलिबाग राजेंद्र सावंत यांनी केले आहे.

## ब्रह्मांड संगीत कट्टयाच्या शाखेचे उदघाटन



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : गेली अठरा वर्षं सामाजिक संस्कृतिक क्षेत्रात काम करणारी ब्रह्मांड कट्टा संस्था त्याच्या अंतर्गत विविध उपसंस्था कार्यरत आहेत. त्याचाच एक भाग ब्रह्मांड संगीत कट्टा गेली आठ वर्षं संगीत क्षेत्रात कार्यरत आहे. त्याच्या विविध पाच शाखा घोडबंदर रोड ब्रह्मांड येथे दोन तर ठाणे शहर शाखा, वसंत विहार शाखा, कोलशेत ढोकाळी शाखा सध्या संगीत क्षेत्रात त्या त्या परिसरात कार्यरत आहेत. ब्रह्मांड संगीत कट्टयाचे प्रथम अध्यक्ष कै. अरुण दळवी काका यांच्या आशिर्वादाने व गणपतीच्या आगमनाचे औचित्य साधून कोपरी ह्या पाचव्या शाखेचा शुभारंभ रविवार दिनांक 24 ऑगस्ट २०२५ रोजी विद्यासागर एज्युकेशन सोसायटी हिंदी शाळा, कोपरी कॉलनी येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला. सदर शाखेचे उदघाटन जनसेवक ठाणे शहर आमदार संजय केळकर, कोकण पदवीधर मतदार संघाचे आमदार निरंजन डावखरे, भाजपा ठाणे शहर अध्यक्ष संदीप लेले व ब्रह्मांड कट्टा परिवाराचे संस्थापक राजेश जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. कोपरी परिसरातील संगीत प्रेमींना एक उत्तम व्यासपीठ उपलब्ध झाल्याचे प्रतिपादन प्रमुख पाहुणे संजय केळकर यांनी केले व कट्टयाला सर्वतो परीची मदत सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. तर डावखरे व लेले यांनी ब्रह्मांड कट्टा करीत असलेल्या सामाजिक सांस्कृतिक करायचे कौतुक केले तसेच संस्थापक राजेश जाधव यांनी ब्रह्मांड संगीत कट्टयाच्या नजीकच्या काळात अजून काही शाखा निर्माण करण्याचा मानस केला. ब्रह्मांड संगीत कट्टा कोपरी शाखेचे अध्यक्ष पद अंजली संत, सचिव हरीश भगनानी, खजिनदार अनंत मुळे, उपाध्यक्ष विद्याधर अपशंकर तर सहसचिव सचिन कोरे यांची निवड करण्यात आली .

शुभारंभाच्या कार्यक्रमास स्थानिक समाजसेवक रमाकांत पाटील ब्रह्मांड कट्टयाचे अध्यक्ष महेश जोशी, सचिव स्नेहल जोशी, प्रगती जाधव, कलासंस्कार अध्यक्षा वर्षा गंद्रे तसेच सर्व ब्रह्मांड संगीत कट्टा शाखेचे पदाधिकारी सावन कुमार सुपे, प्रल्हाद माघाडे, मनीषा ठाणेकर, मंगेश भोईर, प्राजक्ता रामाडे, दिवाकर शेट्टी, संतोष वाघपंजे, दत्ता पाटील, जादूगार मधुगंधा इंद्रजीत कळव्याच्या गंधार स्टुडिओचे प्रसाद चौलकर आणि समस्त संगीत प्रेमी शुभेच्छा देण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या प्रसंगी विभागातील कलाकारांनी सोलो डुएट अशी एकूण तीस गाणी सादर केली व रसिकांनी मंत्रमुग्ध केले. प्रेक्षकांसाठी चहा नाष्टाची व्यवस्था वास्तुशास्त्र सल्लागार भरत ठाकूर यांनी केली तर कल्पांत डिजिटल व्हिडीओ ग्राफिक्स यांनी पडदयावर कार्यक्रमाची सुंदर कल्पना साकार केली. कार्यक्रमाचे निवेदन सहसचिव सचिन कोरे यांनी केले तर अध्यक्षा अंजली संत यांनी आभार व्यक्त करून कार्यक्रमाची सांगता केली.

## सार्वजनिक गणेशोत्सव स्पर्धेसाठी अर्ज सादर करण्यास मुदतवाढ
### सांस्कृतिक कार्यमंत्र्यांची घोषणा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : राज्य शासनाच्यावतीने या वर्षीपासून महाराष्ट्रातील गणेशोत्सव हा महाराष्ट्राचा राज्य उत्सव म्हणून साजरा करण्यात येत आहे. या राज्य उत्सवाअंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा 2025च्या अर्ज सादर करण्याच्या अंतिम तारखेस मुदतवाढ देण्यात आल्याची घोषणा राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी केली. या स्पर्धेत अधिकाधिक मंडळांना सहभागी होता यावे, यासाठी आता अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख मंगळवार दि.26 ऑगस्ट 2025 असेल.

या स्पर्धेचे अर्ज https://ganeshotsav.pldmka.co.in या संकेतस्थळावर उपलब्ध ऑनलाइन पोर्टलद्वारे स्वीकारले जाणार आहेत. या स्पर्धेत अधिकाधिक मंडळांनी सहभागी होऊन तालुकास्तरीय, जिल्हास्तरीय व राज्यस्तरीय पारितोषिके जिंकण्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी केले आहे.

## रोजगार, उद्योजकता विभागामार्फ़त जागतिक कौशल्य स्पर्धा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत जागतिक कौशल्य स्पर्धा 2026 शांघाई येथे आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेमध्ये सहभागी होण्यासाठी 50 क्षेत्रांकरिता उमेदवाराचा जन्म दि.1 जानेवारी, 2004 किंवा तद्नंतरचा असणे अनिवार्य आहे तसेच, Digital Construction, Cloud Computing, Cyber Security, ICT Network Infrastructure, Additive Manufacturing, Industrial Design Technology. Industry ८.०, Mechatronics, Optoelectronic Technology. Robot Systems Integration, Water Technology, Dental Prosthetics, Aircraft Maintenance या क्षेत्राकरिता उमेदवाराचा जन्म दि. 1 जानेवारी, 2001 किंवा तदनंतरचा असणे अनिवार्य आहे.

तरी ठाणे जिल्ह्यातील या स्पर्धेकरिता इच्छुक असणाऱ्या पात्र उमेदवारांनी https://www.skillindiadigital.gov.in या लिंकवर भेट देवून दि.30 सप्टेंबर 2025 पर्यंत जास्तीत जास्त नाव नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त संध्या साळुंखे यांनी केले आहे.

## नगराध्यक्ष संतोष चौधरी यांच्याकडून श्रीगणेश पुजन साहित्य वाटप



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : मुरबाड नगरपंचायतचे विद्यमान नगराध्यक्ष संतोष(बाब) चौधरी यांनी मागिल वर्षापासून गौरी - गणपती एक नाविन्यपूर्ण उपक्रम हाती घेतला आहे. गणेश उत्सवाच्या काळात घरगुती गणपतीच्या पुजेसाठी लागणारे साहित्याचे वाटप ते स्वतः घरोघरी जाऊन करणार आहेत.मागिल वर्षी त्यांनी हा उपक्रम सुरु केला असून या वर्षी मुरबाड शहरातील दोनशे घरगुती गणपतींना हे साहित्याचे वाटप ते करणार आहेत.यामध्ये श्री गणेशाच्या पुजेसाठी लागणारे सर्वच साहित्याचा समावेश असणार आहे.सुरूवातीला आपल्या प्रभागात सुरुवात केलेली संकल्पना परंतु या वर्षी संपूर्ण शहरामधे वाटप करणार

**सुरूवातीला आपल्या प्रभागात सुरुवात केलेली संकल्पना परंतु या वर्षी संपूर्ण शहरामधे वाटप करणार असून या निमित्ताने श्रीगणेशाची सेवा होत असून लोकांच्या घरापर्यंत पोहचण्याची संधी मिळत असल्याचे नगराध्यक्ष संतोष चौंधरी यांनी सांगितले**

असून या निमित्ताने श्रीगणेशाची सेवा होत असून लोकांच्या घरापर्यंत पोहचण्याची संधी मिळत असल्याचे नगराध्यक्ष संतोष चौधरी यांनी सांगितले. यावेळी माजी नगराध्यक्ष राम दुधाळे, नगरसेवक मोहन गडगे,मा.नगरसेवक विकास वारघडे, सामाजिक कार्यकर्ते नंदकुमार जाधव, सागर चंबावणे, विनायक राव उपस्थित होते.



## आजचे राशि भविष्य

**मेष**
कुटुंबात विशेष लोकांचे आगमन होऊ शकते, आज तुम्ही त्याच्या तयारीत व्यस्त असाल. आज तुम्हाला तुमच्या आयुष्यातील काही मोठा निर्णय घ्याल.

**वृषभ**
आज तुमची नियोजित कामे वेळेवर पूर्ण होताना दिसेल.इलेक्ट्रॉनिक्स व्यापाऱ्यांना लाभाची शक्यता आहे. वैवाहिक जीवनात जवळीक वाढेल.

**मिथुन**
तुमचे आरोग्य सुधारत राहील. आज तुम्हाला तुमचे नियोजित काम पूर्ण करण्यात यश मिळेल. स्थावर मालमत्तेशी संबंधित काम पुढे सरकेल.

**कर्क**
व्यवसायात सुखद बदल होतील. तुमच्या जीवनात पैशाशी संबंधित काही समस्यांमुळे तुम्ही त्रस्त होऊ शकता. जीवनसाथीसोबत वाद होऊ शकतो.

**सिंह**
वैवाहिक जीवनात खूप आनंद असेल. सरकारी विभागातील कर्मचाऱ्यांच्या पगारात वाढ होऊ शकते आणि लवकरच काही चांगली बातमी मिळेल.

**कन्या**
आज संध्याकाळी आपण बाहेर जेवू. मुलांशी परस्पर स्नेह वाढेल. शिक्षकांच्या बदलीच्या अडचणी संपतील, हव्या त्या ठिकाणी बदल्या होतील.

**तूळ**
संपत्तीशी संबंधित कोणताही वाद सोडवला जाऊ शकतो,खाण्यापिण्याच्या सवयींमध्ये निष्काळजीपणा आरोग्यासाठी हानिकारक ठरू शकतो.

**वृश्चिक**
तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल खूप आनंदी असेल. तुमच्या मनात आनंद होणार नाही. अध्यात्माद्वारे तुम्ही तुमचे मन शांत ठेवण्याचा प्रयत्न कराल.

**धनु**
मेहनतीने व्यवसायात प्रगती कराल.चांगली बातमी मिळेल. संध्याकाळ मुलांसोबत विचार समजून घ्याल.. तुमच्या नात्याची लवकरच पुष्टी होईल.

**मकर**
आर्थिक स्थिती मजबूत होईल.तुमच्या मेहनतीने व्यवसायात प्रगती कराल. आज तुम्हाला चांगली बातमी मिळेल.मित्र तुमचे मनोबल वाढवतील. आज

**कुंभ**
कायदेशीर कामासाठी धावपळ केल्यामुळे थकवा जाणवेल. वैवाहिक जीवनात एकमेकांना समजून घ्यावे लागेल. यामुळे गैरसमज होणार नाहीत.

**मीन**
बोलण्यावर नियंत्रण ठेवा. सुखद क्षण अनुभवाल. नोकरीतील बदलामुळे चांगली प्रगती होण्याची शक्यता आहे.तुम्हाला समाजात मान-सन्मान मिळेल.



## खर्डी जीवनदीप शैक्षणिक संस्थेत ‘पर्यावरणपूरक गणेशोत्सव’




दै.ठाणे जीवनदीप वार्ता

खर्डी : जीवनदीप शैक्षणिक संस्था संचालित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय खर्डी, येथे आज दिनांक 25 ऑगस्ट 2025 रोजी ठीक सकाळी 10:30 वाजता निसर्गमित्र मंडळ व भूगोल विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने श्री गणेश उत्सवा निमित्त "पर्यावरण पूरक गणेश उत्सव" या उपक्रमा अंतर्गत शाडूच्या मातीपासून श्री गणेशाची मूर्ती साकारण्याच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून लाभलेले दलखन-खर्डी येथील समाजसेवक व मूर्तिकार श्री रामभाऊ जानू जाधव यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून शाडूच्या मातीपासून गणेश मूर्ती साकारण्याचे प्रशिक्षण दिले.

सदर उपक्रमात बहुसंख्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. तृतीय वर्ष भूगोल विभागातील उज्वला टिळे या विद्यार्थिनीने आपल्या मनोगतातून पर्यावरण पूरक गणेशोत्सवाचे महत्व व आपली जबाबदारी यावर आपले विचार मांडले. तर अनेक विद्यार्थ्यांनी स्वतः गणेश मूर्ती साकार करून आपला सहभाग नोंदवला. जीवनदीप शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. श्री रवींद्र घोडविंदे सर व प्राचार्य कैलास कळकटे सर यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यावरण पूरक सण उत्सव साजरे करून या माध्यमातून पर्यावरणाचे जतन व संवर्धन व्हावे या नैतिक जबाबदारीची जाणीव करून देण्याच्या उद्देशाने सदर उपक्रम राबविण्यात आला. कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य, सर्व प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. रजनी परदेशी, प्रास्ताविक प्रा. विशाल भोसले तर तांत्रीक बाजू प्रा. शरद खाकर, प्रा. भूषण विषे, प्रा. नामदेव मांजे यांनी सांभाळली.

## ठाणे वैभव चौक नामफलकाचे प्रताप सरनाईकांच्या हस्ते अनावरण

### आमदार संजय केळकर, संपादक मिलिंद बल्लाळ यांच्या उपस्थितीत झाला सोहळा







दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : ठाणे जिल्ह्यातील ठाणे वैभव या दैनिकाच्या ५१व्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने ठाणे महापालिकेतर्फे नामकरण करण्यात आलेल्या ठाणे वैभव चौकाच्या नामफलकाचे अनावरण परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते सोमवारी दुपारी करण्यात आले. त्याप्रसंगी, आमदार संजय केळकर, ठाणे वैभवचे संपादक मिलिंद बल्लाळ, निखिल बल्लाळ आदी मान्यवर उपस्थित होते.

ठाणे महापालिका क्षेत्रातील लाल बहादूर शास्त्री मार्ग आणि त्यास छेद देणाऱ्या वकिल अल्मेडा मार्ग यांच्या मध्यभागी असलेल्या चौकाचे ठाणे वैभव चौक असे नामकरण करण्यात आले आहे. ठाणे जिल्ह्यातील सुवर्ण महोत्सवी वाटचाल करणाऱ्या या दैनिकाचा हा गौरव आहे. तसेच, महापालिकेकडे जाणाऱ्या मार्गावरील चौकास वर्तमानपत्राचे नाव देण्यात आले हा दुर्मिळ योगायोग असल्याचे प्रतिपादन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केले.

तर, ठाणे वैभवच्या वाटचालीच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाची सांगता होत असताना हे नामकरण संपन्न झाले, ही आनंदाची गोष्ट असल्याचे आमदार संजय केळकर यांनी सांगितले. याप्रसंगी त्यांनी ठाणे वैभवच्या वाटचालीचा गौरव केला.

चौकाच्या नामफलक उद्घाटन प्रसंगी उपायुक्त (माहिती व जनसंपर्क) उमेश बिरारी, कार्यकारी अभियंता मोहन कलाल, कार्यकारी अभियंता ऋषिकेश जवळकर, माहिती व जनसंपर्क अधिकारी रवींद्र मांजरेकर, ठाणे वैभव दैनिकाचे पत्रकार आणि कर्मचारी उपस्थित होते.

# जिर्ण पाईपलाईनवर टाकला जातोय कचरा

## निरपराधांचे जीव धोक्यात - राजन झेमसे

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



पेण : गेल्या काही वर्षांत पेण-खारेपाट परिसरात नागरिकांच्या जीवाशी खेळणारी गंभीर व भयावह परिस्थिती निर्माण झाली आहे. काल पुन्हा एक मृत्यू झाला असून कावीळ होऊन मृत्यू झाल्याची माहिती मिळत आहे. याआधी आठ-दहा दिवसांपूर्वी वाशी गावांतील एका महिलेचा दुषित पाणी प्यायल्याने, कावीळ होऊन अकाली मृत्यू झाला होता. गेल्या वर्षीही याच परिसरात कावीळच्या साथीमुळे चार निष्पापांना आपले प्राण गमवावे लागले. तर काही दिवसांपूर्वी ठाकूर बेडी येथील एका मुलीला दुषित पाण्यामुळे कावीळ झाली आणि तिला कस्तुरबा रुग्णालयात दाखल करावे लागले. दीर्घकालीन उपचारांनंतर ती कशीबशी बरी होऊन घरी परतली. हे सर्व प्रकार स्पष्ट दाखवतात की या विषारी, दुर्गंधीयुक्त आणि घाण-कचऱ्याचा थेट व गंभीर परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर आणि जीवीतावर होत आहे परंतु दुर्दैवाची बाब म्हणजे नागरिकांचे प्राण जात असतानाही प्रशासन निष्क्रियपणे बघ्याची भूमिका घेत आहे, जणू जनतेच्या आरोग्याशी व सुरक्षेशी त्यांना काहीही देणे-घेणे नाही. अशी खंत पेण वाशी खारेपाटातील सामाजिक कार्यकर्ते राजन झेमसे यांनी व्यक्त केली.

राजन झेमसे यांनी पुढे सांगितले की पंधरा-विस दिवसांपूर्वी तालुक्यातील अनेक पत्रकारांनी पेण-खारेपाटाला पाणीपुरवठा करणाऱ्या मुख्य जिर्ण-पाइपलाइनवर टाकल्या जाणाऱ्या कचऱ्या विरुद्ध मोठ्या प्रमाणावर आवाज उठवला, वृत्तपत्रांत सातत्याने बातम्या छापून आणल्याने, तयार झालेल्या जनमतामुळे, उंबर्डे ग्रामपंचायतने कचरा टाकणे तात्पुरते थांबवून, जेसीबी लावून कचरा फक्त पाईपलाईन पासून थोडासा बाजूला सरकवला, लोकांना वाटले की आता हा अमानुष प्रकार थांबेल. पण हे समाधान फार काळ टिकले नाही. मागिल पाच-सहा दिवसांपासून पुन्हा वाशी येथील जिर्ण-पाइपलाइनवर मोठ्या प्रमाणावर कचरा टाकण्यास सुरुवात झाली आहे. आत्ताच थोड्या वेळापूर्वी या पाइपलाइनवर एक गाडी कचरा टाकण्यात आल्याचे दिसत आहे. यावरून प्रशासनाची इच्छाशक्ती पूर्णतः संपलेली आहे, हे स्पष्ट होते.

या पाइपलाइन मधून ज्या गावांना अशुद्ध पाणी पुरवठा होतो, त्या सर्व ग्रामपंचायतींनी आपल्या जनतेच्या आरोग्याची जबाबदारी स्वीकारून ठामपणे आवाज उठवणे गरजेचे आहे. परंतु वास्तव असे की बहुतेक ग्रामपंचायत प्रशासन डोळ्यादेखत सर्व चुकीचे घडत असतानाही गप्प बसलेले आहेत. लोकप्रतिनिधी देखील या गंभीर विषयावर मौन बाळगून आहेत. नागरिकांचे जीवन धोक्यात असूनही स्थानिक प्रशासन व नेतृत्व आवाज उठवत नाही, ही अत्यंत खेदजनक बाब आहे.

त्याहूनही मोठे दु:ख म्हणजे सामान्य नागरिक स्वतःच्या आणि आपल्या मुलांच्या जीवावर बेतले असतानाही, बेफिकीरपणे हे सर्व काही चालू आहे. अगदी दुषीत पाण्यामुळे होणारे मृत्यू आणि आजारपण देखील सहन करत आहेत हे वाईट आहे. समाजाची ही निष्क्रियता आणि प्रशासनाची बेपर्वाई मिळून एक भयंकर अन्याय खारेपाटाच्या जनतेवर होतो आहे. आता वेळ आली आहे की नागरिकांनी एकजूट होऊन या प्रश्नावर निर्णायक लढा द्यावा! अन्यथा या कचऱ्यामुळे अजून किती निरपराध जीव गमवावे लागतील, याची काही शाश्वती देता येणार नाही. यासाठी रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य अधिकारी नेहा भोसले तसेच जिल्हाधिकारी किसन जावळे यांनी प्रत्यक्ष पाहणी करून लोकांच्या जीवाशी चाललेला खेळ थांबवावा अशी मागणी ही राजन झेमसे यांनी केली आहे.

## प्रजापिता ब्रह्माकुमारीच्या वतीने रक्तदान शिबीर संपन्न



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : जागतिक बंधुता दिनाचे औचित्य साधत प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या प्रमुख मार्गदर्शक राजयोगिनी दादी प्रकाशमणीजी यांच्या १८ व्या पुण्यतिथी निमित्त रविवारी माजी उपमहापौर मोरेश्वर भोईर यांच्या भारतीय जनता पार्टीच्या कार्यालयात रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. माजी उपमहापौर मोरेश्वर भोईर यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. या प्रसंगी ब्रह्माकुमारी संस्थेच्या ज्योती दीदी, मोनिष चौधरी, माजी नगरसेवक गणेश भाने, भरत जाधव, गिरीधर कुराडे, संदीप क्षीरसागर, प्रगती भोईर, नीलम भोईर, सोनी क्षीरसागर आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी कूपर हॉस्पिटल रक्तपेढीने रक्त संकलीत केले. 37 रक्तदात्यांनी रक्तदान केले.

## लायन्स क्लब ऑफ पेणचा पदग्रहण व शपथविधी सोहळा संपन्न

दै.ठाणे जीवनदीप वार्ता




पेण : "लायन्स क्लब ऑफ पेण प्राईड क्लबचा पदग्रहण व शपथविधी सोहळा"पेण येथील भाऊसाहेब नेने महाविद्यालयाच्या सभागृहात संपन्न झाला आहे.

यामध्ये लायन्स कॅल्बचे नवनिर्वाचित अध्यक्ष अशोक पुंडलीक भगत याची निवड झाली आहे. तर उपाध्यक्षपदी प्रमोद दिगंबर पाठक, सचीवपदी प्रदिप पाटील, खजिनदारपदी डॉ. देविदास बामणे.सह सचीवपदी डॉ.मधुकर साळुखे लायन्स क्लब च्या बोर्ड ऑफ डायरेक्टर पदी वासुदेव म्हात्रे, हेमंत भगत प्रविण म्हात्रे याची नियुक्ती करण्यात आली आहे. शपथ विधी नंतर पदग्रहण करण्यात आले . सदर कार्यक्रमासाठी जिल्हा प्रांतपाल संजय सूर्यवंशी उपप्रांतपाल प्रवीण सरनाईक माजी प्रांतपाल अनिल जाधव विभागीय अध्यक्ष गिरीश म्हात्रे झोन अध्यक्ष विकास पाटील नितीन अधिकारी प्रदीप सिनकर विजय वनगे प्रदिप पाटील शशिकांत भगत, मंगेश नेने, तर प्रमुख पाहुणे म्हणून दिनेश पाटील मधुकर भगत आर बी पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

# वाहतूक कोंडीविरोधात काल्हेर गांव रस्त्यावर

## स्थानिक टेंपो संघटना व ग्रामस्थांचे आंदोलन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : ठाणे घोडबंदर रस्ता दुरुस्तीकामासाठी राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी कोणत्याही प्रकारचे नियोजन न करता जड व अवजड वाहनांची वाहतूक भिवंडी मार्गाकडे वळविल्याचे निर्देश दिल्याने भिवंडीतील वाहतूक व्यवस्था पुर्णपणे कोलमडून पडली असुन भिवंडी ठाणे या जुन्या मार्गावर प्रचंड प्रमाणात वाहतूक कोंडी झाली आहे. याचा फटका स्थानिक नागरिकांसह नोकरदारवर्ग व शालेय विद्यार्थीना बसला आहे. वाहतूक पोलीस या वाहतूक कोंडी बाबतीत हतबल झाले आहेत त्यामुळे संतप्त झालेल्या स्थानिक टेंपो चालक मालक संघटनांनी व ग्रामस्थांनी शासनाचे लक्ष वेधून घेण्यासाठी आज दुपारी या मार्गावरील काल्हेर गांव येथील रस्त्यावर उतरून घोषणाबाजी करीत दोन तास रस्ता अडवून धरला.वाहतूक कोंडी चा निषेध दर्शविणारे फलक हातात घेवून जोरदार घोषणाबाजी करीत शासनाने व ठाणे पोलीस आयुक्तांनी लक्ष द्यावे अशी अपेक्षा व्यक्त केली.

अचानक केलेल्या आंदोलनामुळे यामुळे अंजूर फाटा ते काल्हेर, पुर्णा,कशेळी या रस्त्यावर प्रचंड प्रमाणात वाहतूक कोंडी निर्माण झाली होती.दरम्यान या वाहतूक



कोंडीच्या प्रश्नावर स्थानिक नागरिकांची वाहतूक शाखेच्या पुढाकाराने होलीमेरी हायस्कूल येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

या बैठकीसाठी भिवंडी ग्रामीण आमदार शांताराम मोरे,ठाणे वाहतूक विभागाचे पोलिस उपायुक्त पंकज शिरसाट उपस्थित होते. यावेळी उपस्थित नागरिकांनी भिवंडी रस्त्यांवर वळविण्यात आलेल्या जड व अवजड वाहतूकी संदर्भात नाराजी व्यक्त करून तात्काळ बंद करण्याची मागणी केली. तसेच या मार्गावर होणारी वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी नियोजन करण्यात यावे अशी मागणी उपस्थित नागरिकांनी केली.

भिवंडी अंजूरफाटा कशेळी मार्गावरील अवजड वाहतूक संदर्भात मांडलेल्या सूचनांनुसार सकाळी 9 ते रात्री 9 या वेळात अवजड वाहनांना ग्रामीण भागात बंदी घालावी,रस्त्या वरील अतिक्रमण हटविण्यात यावीत व रस्त्यावरील वळण रस्ते बंद करावेत अशा मागण्या आमदार शांताराम मोरे यांनी केल्या.त्यामुळे वाहतूक विभागाचे पोलिस उप आयुक्त पंकज शिरसाट यांनी अवजड वाहतूक रात्री 9 ते सकाळी 9 या वेळेत सुरू ठेवण्याच्या सूचना पोलीस निरीक्षक यांना दिल्या आहेत.

**वाहतूक कोंडीचा फटका आमदारांना...**

**या बैठकीसाठी आमदार शांताराम मोरे येत असताना त्यांनासुद्धा वाहतूक कोंडीचा फटका बसला .त्यामुळे त्यांना आपले वाहन सोडून पायी शाळेत बैठकीसाठी यावे लागले.यावेळी होलीमेरी शाळेतील विद्यार्थ्यांनी आमदार मोरे यांच्याकडे वाहतूक कोंडी बाबत तक्रारी केल्या.अनेकांनी या घटनेचे व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल करीत नेटकऱ्यांनी आमदारांची चांगलीच खिल्ली उडवली आहे.**

# ॲड. किरण चन्ने यांच्यावरील हल्ला हा न्यायव्यवस्थेवरील हल्ला !

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

झिडके-अंबाडी : भिवंडीतील अतिरिक्त जिल्हा न्यायालय " वकील संघाचे विद्यमान अध्यक्ष " ॲड. किरण चन्ने यांना याच न्यायालयातील न्यायाधीशांनी सुचित केल्याप्रमाणेच न्यायालयाच्या परिसरात नियमबाह्य वाहन पार्किंगबाबत लक्ष घाला असे सांगितले असता," नो पार्किंग " मधील असणारी "फोअर व्हीलर गाडी"चे मालक ॲड. संजय श्रीवास्तव यांना आपली गाडी काढण्यास सांगितले. सदर व्यक्ति वारंवार याच ठिकाणी आपली गाडी लावत असे व जाणीवपुर्वक नियमांचे उल्लंघन करीत असे. याबाबत समजुतीने ॲड.किरण चन्ने सांगत असताना त्यांच्याशी वाद केला व अश्लील शिवीगाळ करून,एका जबाबदार व प्रतिष्ठित व्यक्तिला अपमानित केले.हा प्रकार इथेच थांबला नाही,तर पाचपन्नास गुंड प्रवृत्तीच्या जमावाकडून लाठ्या काठ्या व धारधार तीक्ष्ण हत्याराने प्राणघातक हल्ला करून,ॲड.किरण चन्ने यांना जीवे ठार मारण्याचे षडयंत्र सोमवार दिनांक- 18/08/2025 रोजी दुपारी ठिक- 2.30 वाजता भिवंडीतील अशोकनगर येथे करण्यात आला.या घटनेचा उल्लेख असे करता येईल की,न्यायालयाच्या



ॲड.किरण चन्ने

दैनंदिन व्यवस्थेला साह्यभूत करणारी व्यक्ति ॲड.किरण चन्ने यांच्यावरील प्राणघातक हल्ला हा वैयक्तिक नसून खऱ्या अर्थाने " न्याय व्यवस्थेवरील हल्ला आहे."

याबाबत सविस्तर वृत्त असे की,ॲड.किरण चन्ने हे "वकील संघटनेच्या निवडणूकीत बहुसंख्य मतांनी निवडून आले, व ते अध्यक्षही झाले.परंतु हा विजय विरोधकांना पचनी पडला नाही,कारण शिव,शाहू,फुले,आंबेडकरी विचार धारेच्या व्यक्तिला आजपर्यंत "वकील संघटनेचे अध्यक्ष पद " कधीच मिळाले नाही,ॲड.किरण चन्ने हे सामाजिक क्षेत्रातील तडफदार नेतृत्व असल्यामुळेच त्यांचे कार्य ज्यांना मान्य नाही अशा जातीयवादी वृत्तीने पछाडलेल्या मनोवृत्तीकडून त्यांना मानहानिकारक षडयंत्राने

**ॲड.किरण चन्ने यांच्यावर आत्तापर्यंत तीन ते चार वेळेस ‘मॉब लिचिंग’ कृत्य तसेच बंदुकीने गोळीबार अशा जीवघेण्या हल्ल्यातून ते बुद्धिचातुर्याने वाचलेले आहेत.**

बदनाम करणे,याच वृत्तीने सोमवार दिनांक-18/08/2025 रोजी न्यायालयाच्या आवारात गाडी पार्किंग चा वाद स्पष्टपणे आहे. यामध्ये भिवंडी शहर वा ठाणे-पालघर जिल्ह्यातील एक "डॅशिंग " नेतृत्वाला दाबण्याचा प्रकार सध्या भिवंडीतील सत्ताधारी लोकप्रतिनिधींकडून केला जात आहे, म्हणूनच प्रत्येक वेळेस याचा अनुभव ॲड.किरण चन्ने यांना आलेला आहे.आत्तापर्यंत त्यांच्यावर तीन ते चार वेळेस "मॉब लिचिंग" कृत्य तसेच बंदुकीने गोळीबार असे जीवघेणे हल्ल्यातून ते बुद्धिचातुर्याने वाचलेले आहेत.

दिनांक-18/08/2025 रोजीच्या प्राणघातक हल्ल्यातून भिवंडीतील शांतीनगर पोलीसांकडून हल्लेखोरांना सहीसलामत सोडून ॲड.किरण चन्ने यांच्यावरील कलम 307 अन्वये राजकीय दबावापोटी गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे,या पोलीसांच्या अन्याविरोधात बहुजनसमाजात किंबहुना आंबेडकरी समाजात संताप व्यक्त करण्यात येत आहे,या अन्यायकारक बाबींचा निषेध आणि पुढील कार्यवाहीसाठी रविवार दिनांक- 24/08/2025 रोजी " रिपाई सेक्युलर चे राष्ट्रीय अध्यक्ष-शामदादा गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली कल्याण " अत्रे रंगायतन" येथे विविध क्षेत्रातील मान्यवर कार्यकर्त्यांची वैचारिक सभा घेण्यात आली,या सभेत ॲड.किरण चन्ने यांच्यावरील झालेल्या प्राणघातक हल्ल्यातील गुन्हेगार,सूत्रधार यांच्यावरील कारवाई करण्यासाठी जनआंदोलन उभारणे व ॲड.किरण चन्ने यांच्यावरील कलम 307 रद्द करण्याचा निर्धार सदर ठिकाणी घेण्यात आला आहे.कारण ॲड. किरण चन्ने हा व्यक्तीशः विषय नसून तमाम बहुजनसमाज किंवा आंबेडकरी चळवळ संपविणा-याना कशी अद्दल घडविता येईल की,जेणेकरून शिव,शाहू,फुले,आंबेडकर यांच्या प्रेरणेतून कार्य करणाऱ्या नेतृत्वाला भविष्यात कुणी छेडू शकणार नाही.

अशा प्रकारे कल्याणच्या सभेत सर्वानुमते ठरविण्यात आले आहे.

## वाशिंद येथे गणेश सजावट स्पर्धा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

वाशिंद : गणेशोत्सवा निमित्त महाराष्ट्र नवनिर्माण वाशिंद शहर यांच्या वतिने गणपती सजावट स्पर्धा 2025 चे आयोजन करण्यात आले आहे.

या स्पर्धेत सहभागी होणा-या गणेश भक्तांनी दिड दिवस व अडीच दिवस गणपती असणा-या स्पर्धकांनी दि. 27/8/2025 रात्री 11वाजेपर्यंत आपल्या बाप्पाचे सजावटीचे फोटो व व्हिडीओ पाठवावे. तसेच ही स्पर्धा सर्वांसाठी खुली असणार असली तरी वशिंद शहरा पुरतीच मर्यादित असणार आहे. सजावटीचा व्हिडीओ 60 सेकंदांपेक्षा जास्त नसावा. या स्पर्धेत सहभागी होणा-या विजेत्यांचे सजावटींचे फोटो व नाव सोशल मिडीयाव्दारे सर्वापर्यत पोहचवले जाणार आहेत. या स्पर्धेत सहभागी झालेल्यांची निवड सजावटीच्या ठिकाणी परीक्षक स्वता भेट देऊन परिक्षण करून विजेते ठरवणार आहेत. या स्पर्धेत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन मनसे वाशिंद शहर अध्यक्ष अमोल बोराडे व शहर सचिव कल्पेश शेलार यांनी केले आहे.



# ठाणे जिल्ह्यातील युवक-युवतींसाठी इस्त्राईलमध्ये रोजगाराची संधी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागांतर्गत ठाणे जिल्ह्यातील युवक युवतींना इस्त्राईल होम बेस केअर गिव्हर वर्कर्स या क्षेत्रात रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यात येत आहे. इंग्रजी भाषेचे सामान्य ज्ञान असणाऱ्या व 25 ते 45 वर्षे वयोगटातील उमेदवार या योजनेमध्ये सहभागी होण्यास पात्र आहेत. उमेदवारांकडे काळजीवाहू (घरगुती सहाय्यक) सेवांसाठी निपूण / पारंगत, भारतातील नियामक प्राधिकरणाद्वारे मान्यताप्राप्त असलेले व किमान 990 तासांचा कोर्स पूर्ण केलेले प्रमाणपत्र (ऑन जॉब ट्रेनिंग सह) असणे आवश्यक आहे. भारतीय प्राधिकरणाद्वारे प्रदान केलेल्या या मिडवाइफरीमधील प्रशिक्षण, संबंधित भारतीय देखरेखीखाली अधिकाऱ्यांच्या किंवा नर्सिंग, फिजिओथेरपी, नर्स असिस्टंट मधील प्रशिक्षण पूर्ण, जीडीए/ एएनएम/जीएनएम/बीएससी नर्सिंग / पोस्ट बीएससी नर्सिंगची शैक्षणिक पात्रता आवश्यक आहे. तरी ठाणे जिल्ह्यातील जास्तीत जास्त युवक-युवतींनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी http://maharashtrainternational.com या अधिकृत संकेतस्थळावर आपली माहिती भरावी तसेच अधिक माहितीसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, ठाणे या कार्यालयास संपर्क करण्याचे आवाहन जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त संध्या साळुंखे यांनी केले आहे.

# बाप्पाच्या मुर्तीवर अखेरचा हात फिरवण्याची मुर्तीकारांची लगबग



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

वाशिंद : गणेशोत्सव अवघ्या दोन दिवसावर येवून ठेपल्याने गणेश मुर्तीकार गणेश मुर्तीवरुन अखेलचा हात फिरवताना दिसून येत आहे.

सतत पडणाऱ्या पावसामुळे बनविलेल्या मुर्ती सुकण्यात वेळ जात असल्याने कलर कामात मोठी अडचण निर्माण झाली होती. ओल्या मुर्तीवर कलर देणे शक्य नसल्याने त्या सुकत पर्यंत थांबावेच लागत असल्याने आता कामाचा चेप वाढला आहे. गणपती बनविण्या साठी लागणारी माती, वेगवेगळ्या प्रकारचे कलर यांचे भाव वाढल्याने मुर्तीच्याही किमती 10 ते 15 टक्यानी वाढल्याने मुर्ती विक्रेते राऊत यांनी सांगीतले. वाशिंद येथील श्री. ओंकार कला केंद्रात सौ. स्नेहल पाटील या गणेश मुर्तीवर अखेरचा हात फिरवत असताना त्या म्हणाल्या की माझा पहिलाच वर्ष या व्यवसायाचा आहे. मला सजावटीची आवड असल्याने बाप्पाच्या मुर्तीवर अखेरचा हात फिरवताना समाधान तर मिळतेच आनंदही मिळते. दोन दिवसावर गणपतीचे आगमन आले असल्याने मनावर तर दडपण आहे. पण गणपती बांप्पा ते निभाऊन नेईल याचा मला विश्वास आहे.

# ‘आपले सरकार’ पोर्टल सेवा आता व्हॉट्सॲपच्या माध्यमातून

## – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : राज्य शासनाच्या विविध विभागांकडून नागरिकांना सेवा पुरवल्या जातात. या सेवांसाठी आपले सरकार हे पोर्टल असून या पोर्टलवरील सर्व सेवा व्हॉट्सॲपच्या माध्यमातून पुरवण्यात याव्यात. तसेच सर्व सेवा योग्यप्रकारे आणि गरजेनुसार पुरवण्याच्यादृष्टीने सर्व तालुक्यांमध्ये एक रिंग तयार करण्यात यावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

वर्षा निवासस्थानी सेवा सुलभीकरणासाठी मुख्यमंत्री फडणवीस यांनी आज राज्यातील नागरिक सेवांसंदर्भात आढावा बैठक घेतली. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या एकाच प्रकारच्या 9 सेवा एकत्र करण्याचे निर्देश देऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, सेवा पुरवठ्याच्या गुणवत्तेची खात्री करण्यासाठी त्रयस्थ संस्थेमार्फत नियमितपणे पडताळणी करण्यात यावी, तसेच अर्ज प्रक्रियेत लागणारी कागदपत्रांची संख्या लक्षणीयरित्या कमी करण्यासाठी नियोजन करावे. सर्व जिल्हा परिषद, महापालिका आणि विद्यापीठांचे डॅशबोर्ड एकसमान असावेत, जेणेकरून राज्यभरातील नागरिकांना एकसंध अनुभव मिळेल, या सेवेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी रिंग व क्लस्टर प्रणाली राबवण्यात यावी. रिंगमध्ये सुरवातीस त्या तालुक्यातील १० ते १२ गावांचा समावेश असावा व गरजेनुसार सेवा पुरवण्यात याव्यात. या रिंगच्या व्यवस्थापनासाठी स्वतंत्र गट व व्यवस्थापन टीम तयार करावी. तसेच सेवा पुरवण्यासाठी डिश डिजिटल सेवा हबचा वापर करण्याचे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.

मुख्य सचिव राजेश कुमार यांनी सेवा वितरणात अपीलची सुविधा उपलब्ध करून देण्याचे आणि प्रमाणपत्र वितरणासाठी मल्टी-मॉडेल प्रणाली (जसे की ईमेल, पोर्टल, व्हॉट्सॲप) वापरण्याच्या सूचना दिल्या. आपले सरकार पोर्टलच्या माध्यमातून सध्या राज्यात 1001 सेवा पुरवण्याचे काम सुरू असून त्या पैकी ९९७ सर्व पोर्टलवर उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. गेल्या पंधरा दिवसामध्ये पोर्टलवर उपलब्ध असलेल्या सेवांमध्ये २३६ सेवांची वाढ झाली आहे.राज्य सेवा हक्क आयोगाचे आयुक्त मनुकुमार श्रीवास्तव, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त भूषण गगराणी, अपर मुख्य सचिव (नियोजन) राजगोपाल देवरा, सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव डॉ.हर्षदीप कांबळे, माहिती तंत्रज्ञान विभागाचे प्रधान सचिव पराग जैन नैनुटीया, महाआयटीचे व्यवस्थापकीय संचालक संजय काटकर आदी यावेळी उपस्थित होते.




# गणेशोत्सवाच्या खरेदीसाठी बाजारपेठा सज्ज



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

वाडा : गणेशोत्सव अवघ्या दोन दिवसांवर आला असताना उत्सवाच्या खरेदीसाठी दुकानांत गणेश भक्तांची लगबग पहायला मिळाली. तीन दिवस मुसळधार पावसामुळे घरातून बाहेर पडणे अवघड झाल्याने पाऊस थांबताच नागरिकांनी दुकानांमध्ये गर्दी केल्याचे चित्र पहायला मिळाले. अवघ्या दोन दिवसांवर गणेशोत्सव आल्यामुळे बाप्पाच्या आगमनाच्या तयारीला वेग आला आहे. बाजारपेठा सज्ज झाल्या आहेत. पर्यावरणपूरक सजावटीचे साहित्य, पूजेचे साहित्य, लाईटच्या माळा, सजावटीसाठी विविध प्रकारांची फुले आदींनी बाजारपेठ सजली आहे. नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणात खरेदीचा उत्साह शिगेला पोहोचल्याचे दिसून आले. गणपती बाप्पासाठी मुकुट, कंठ्या, कड्या, तोडे, दुर्वाहार, फळे, लाडू, सोनपट्टी, त्रिशूळ, डमरू आदि गणपतीचे अलंकार गणेश भक्तांना आकर्षित करीत आहेत. बाप्पाच्या विविध रूपांची टी-शर्ट विक्रीस उपलब्ध झाली आहेत. गणपतीला नैवेद्य आणि इतर साहित्य ठेवण्यासाठी आकर्षक चौरंग, पाट गणेश भक्तांचे लक्ष वेधून घेत आहेत. लाडक्या बाप्पासाठी कापडी फुले, रंगीत मण्यांची तोरणे विक्रीसाठी आले आहेत. दरम्यान पावसाचा फटका गणेश भक्तांसोबत रस्त्यावर विक्रीसाठी बसणाऱ्या दुकानदारांना चांगलाच बसला त्यामुळे पावसाने दोन-तीन दिवस ठप्प झालेल्या व्यवसायाला पुन्हा एकदा चालना मिळू लागल्याने विक्रेते विविध वस्तूंची विक्री करताना दिसत आहेत.

# बोईसरच्या वरद रुग्णालयाच्या मार्फत पालघर येथे आरोग्य तपासणी शिबीर



शिबिरातून ‘झाडे लावा झाडे जगवा’चा संदेश

**हसमुख शैक्षणिक आणि सामाजिक संस्थेच्या माध्यमातुन नागरिकांच्या आरोग्याच्या सोबतच पर्यावरणाच्या आरोग्याची काळजी सुद्धा आपण सर्वांनी घ्यायला हवी म्हणुन झाड़े लावा झाड़े जगवा हा पर्यावरण संवर्धनाचा सुंदर संदेश झाडचे रोप भेट देऊन करण्यात आले.**

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पालघर : हसमुख शैक्षणिक आणि सामाजिक संस्था पालघर यांच्या माध्यमाने वरद मल्टीस्पेशालिटी होस्पिटल बोईसर यांच्या मार्फत आंबेडकर नगर पालघर पूर्व येथे मोफत आरोग्य तपासणी आणि उपचार शिबिर संपन्न.

हे शिबिराचे नियोजन हसमुख संघटनाचे कार्यकर्ते विक्रम गावंडे, पंकज जाधव, स्वप्निल जाधव, रश्मी जाधव, सानिका जाधव, कौतुक राऊत,मिलिंद जाधव अतुल जाधव, प्रथम राऊत यांच्या वतीने आरोग्य शिबिर संपन्न करण्यात आला. या शिबिराला पत्रकार ऋषिकेश जाधव, पत्रकार मंगेश उईके, सामाजिक कार्यकर्ते कल्पेश गायकवाड, शिवसेनेचे वृषभ वारे, यांनी सुद्धा उपस्थित दर्शवली. या शिबिराचे आयोजकांन कडून झाडाचं रोपटे देऊन सत्कार करण्यात आला.

# पेण येथे जिल्हास्तरीय थांग-ता स्पर्धा संपन्न



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : पेण येथे रायगड थांग - ता असोसिएशन तर्फे आमदार रविशेट पाटील साहेब ह्यांच्या वाढदिवसाचे अवचित्त साधुन पेण येथील तालुका क्रिडा संकुल येथे जिल्हा स्तरीय थांग - ता स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते ह्या स्पर्धेचे उदघाट्न पेण नगरपरिषदेचे माजी गटनेते अनिरुद्ध पाटील ह्यांच्या हस्ते करण्यात आले. ह्या वेळीभाजपा बुथ प्रमुख रोहन सोनावणे, तसेच रायगड थांग-ता असोशिएशन चे अध्यक्ष रविंद्र म्हात्रे उपाध्यक्ष प्रशांत गांगर्डे, प्रशिक्षक विनायक पाटील, प्रतीक कारंडे, सिध्देश भोपी, प्रथमेश मोकल, रोहीत भोसले , प्रफुल्ल मोटे, निलेश ओव्हाळ, अयूष रसाळ, प्राजक्ता तेटमे, अयुष पाटील ,श्रेयश माळी,हर्षाली पेणकर, वरध केणी, अशरफ अली, रितुल म्हात्रे, रितेष पवार, आयेषा बेगम, आर्यन म्हात्रे ,निशिगंध पाटील, सलोनि सावंत, वेदा पाटील भक्ती भानुस्कर, श्रावणी म्हात्रे आदी उपस्थित होते.

# भिवंडीत रेझांग येथे शहिद कलश यात्रेचे स्वागत

## सैंन्यात यादव रेजिमेंटची स्थापना करण्याची मागणी



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : भिवंडीतील नाशिक - मुंबई महामार्गावरील सोनाळे गांव येथील सत्यम पेट्रोल पंपाच्या परिसरात अखिल भारतीय यादव महासभेने रेझांगला शूर शहीदांच्या भूमीतून आणलेल्या कलशाची (माती) पूजा केली. तसेच कलश यात्रेत सहभागी झालेल्या लोकांचे भिवंडी यादवसंघाच्यावतीने पुष्पहार घालून स्वागत करण्यात आले.

मुंबईच्या यादव संघाचे मुख्य समन्वयक अजय यादव व भिवंडी यादव संघ शाखेच्यावतीने समाजातील लोकांनी कलश पुजन व स्वागत कार्यक्रम आयोजित केला होता. १९६२ मध्ये चीनने केलेल्या हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून १२० शूर सैनिकांनी लडाख येथील रेझान्गला या ठिकाणी युद्ध करून चिनी सैनिकांना चोख प्रत्युत्तर दिले आणि चिनी सैनिकांना परत जाण्यास भाग पडून विजय मिळवला. या विजयात ११४ यादव सैनिक शाहिद झाले. त्या ठिकाणी यादव सैनिकांच्या स्मृतीप्रित्यर्थ यादव शाहिद धाम बनविलेला आहे. त्या शूर सैनिकांच्या बलिदानाच्या स्मृती जगविण्यासाठी अखिल भारतीय यादव महासभेचावतीने रेझान्गला भूमीची माती भरलेला कलश देशातील विविध ठिकाणी जाऊन यादव समाजाचा इतिहास सांगत आहे. १३ एप्रिल रोजी बिहारच्या छपरा जिल्ह्यातून, झारखंड, बंगाल, ओडिशा, छत्तीसगड, आसाम, त्रिपुरा, आगरतळा, आंध्र प्रदेश, केरळ, तामिळनाडू, तेलंगणा, कर्नाटक मार्गे फिरून या कलश यात्रेने ११७ व्या दिवशी महाराष्ट्राच्या सीमेत प्रवेश असुन तो भिवंडीतील सोनाळे गांव येथे आला असुन दुपारी कलश यात्रेचे भव्य स्वागत करण्यात आले,भिवंडीतील यादव समाजाचे पदाधिकारी अजय यादव,पी. डी.यादव, आचार्य सुरजपाल यादव,डॉ. ब्रिजेश यादव, चंद्रभान यादव,राजेंद्र यादव, डॉ.श्यामनारायण यादव,ॲड.राकेश यादव, विनोद यादव, विद्याचरण यादव यांच्या सह शेकडो समाज बांधव पुजन व स्वागत कार्यक्रमात सहभागी झाले होते. यादव समाजाच्या शूर सुपुत्रांनी सैन्यात विशेष योगदान दिले आहे,त्यामुळे संपूर्ण देशात अहिर (यादव) सैन्यात रेजिमेंटची मागणी केली जात आहे.तसेच सर्व ठिकाणी जातीची जनगणना होणे आवश्यक आहे,ज्याच्या आधारे समुदायाचा सहभाग सुनिश्चित केली जाईल अशी मागणी शासनाकडे करण्यात आली असल्याची माहिती अजय यादव यांनी दिली. यावेळी शेकडो लोकांनी पवित्र कलशावर पुष्प अर्पण करून शहीदांना आदरांजली वाहिली.

# गणपती विसर्जन करणाऱ्या बांधवांना सन्मानित करा : भाजपाची मागणी



भाजपा पदाधिकारी सुशील पायाळ यांनी घेतली आयुक्तांची भेट

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण डोंबिवली महानगरपालिका ”अ” प्रभाग क्षेत्रात गणपती विसर्जनासाठी गणेश गणेश घाटावर प्रतिवर्षी मदत करणाऱ्या आणि सहकार्य करणाऱ्या कोळी बांधवांना आपल्या परीने मानधन देऊन प्रशस्तीपत्रक देऊन सन्मानित करण्याची मागणी भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी सुशील पायाळ यांनी केली आहे. याबाबत त्यांनी केडीएमसी आयुक्त अभिनव गोयल यांची भेट घेऊन निवेदन दिले आहे.

गणेश उत्सवाच्या काळामध्ये प्रत्येक गणेश घाटावर गणपती बाप्पाचे विसर्जन करण्यासाठी वर्षानुवर्ष स्थानिक कोळी बांधव पालिका प्रशासनाला तसेच सर्वसामान्य जनतेला सहकार्य करतात. परंतु कोळी बांधवांच्या मनामध्ये एका गोष्टीची असलेली खदखद अशी आहे की आम्ही कुठल्याही प्रकारच्या अपेक्षा न ठेवता पालिका प्रशासनाला तसेच सर्वसामान्य जनतेला गणपती बाप्पाचे विसर्जन करण्यासाठी निस्वार्थ भावनेतून मदत करत असून सुद्धा आतापर्यंत पालिका प्रशासनाने आमच्या कार्याची कुठल्याही प्रकारे दखल घेतलेली नाही. त्यामुळे कोळी बांधवांच्या मनातील खदखद आपल्या पुढाकाराने दूर करावी व कोळी बांधवांचे असलेले वर्षानुवर्षाचे सहकार्य अविरत पालिका प्रशासनाला व सर्वसामान्य जनतेला लाभत राहो. तरी या विषयासंदर्भात व कोळी बांधवांच्या असलेल्या माफक इच्छेला विचारात घेता धोरणात्मक निर्णय घेऊन सर्व निस्वार्थ कोळी बांधवांचा मानसन्मान करण्याची मागणी सुशील पायाळ यांनी आयुक्तांकडे केली आहे.

## निवासी आयुक्त तथा सचिव आर. विमला यांची

# महाराष्ट्र सदनातील गणेशोत्सव मंडपांची पाहणी



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

नवी दिल्ली : गणेशोत्सवाला यंदा राज्य उत्सवाचा दर्जा मिळाल्याने महाराष्ट्राच्या सांस्कृतिक उत्साहाला नवे वैभव प्राप्त झाले आहे. या पार्श्वभूमीवर दिल्लीतील महाराष्ट्र सदनात गणेशोत्सवासाठी उभारण्यात आलेल्या मंडपासह स्वयंसहाय्यता गटांच्या दालनाची पाहणी निवासी आयुक्त तथा सचिव. आर. विमला यांनी आज केली.

कोपर्निकस मार्गावरील महाराष्ट्र सदनात दहा दिवसीय स्वयंसहाय्यता गटांचे प्रदर्शनासह गणेशोत्सवाचे आयोजन उत्साहात होणार आहे. पाहणीवेळी सहाय्यक निवासी आयुक्त स्मिता शेलार, महाराष्ट्र परिचय केंद्राच्या उपसंचालक मनिषा पिंगळे आणि व्यवस्थापक प्रमोद कोलपते उपस्थित होते.

या वेळी आर. विमला यांनी मंडप व स्वयंसहाय्यता गटांच्या दालनाच्या सजावटीत पर्यावरणस्नेही साहित्याचा वापर करण्यावर भर दिला. गणपती मूर्तीच्या स्थापनेच्या जागेची सुरक्षिततेची काळजी, अग्निशमन व विद्युत यंत्रणेची योग्य व्यवस्था तसेच पावसाळी वातावरण लक्षात घेऊन जलरोधक ताडपत्री व पाण्याचा निचरा होण्यासाठी आवश्यक सुविधा करण्याच्या महत्त्वपूर्ण सूचना त्यांनी दिल्या.

### गणेशोत्सव आणि स्वयंसहाय्यता गटांचा अनोखा संगम

महाराष्ट्र सदनात दरवर्षी गणपती बाप्पाचे स्वागत उत्साहपूर्ण वातावरणात केले जाते. यंदा नाशिक, बीड आणि पालघर जिल्ह्यातील स्वयंसहाय्यता गट तसेच स्थानिक कारागीर आपल्या हस्तकौशल्याची जादू सादर करणार आहेत. दालनात खादी, बटिक, बांधणी, वारली चित्रकला, चामड्याची उत्पादने, दागिने आणि पारंपरिक खाद्यपदार्थांचे प्रदर्शन भाविकांना आकर्षित करणार आहे. विशेष म्हणजे, लाइव्ह किचनद्वारे ताज्या खाद्यपदार्थांची निर्मिती आणि आस्वाद घेण्याची सुविधा उपलब्ध असणार आहे. त्यामुळे भाविकांना महाराष्ट्राच्या समृद्ध खाद्यसंस्कृतीचा थेट अनुभव घेता येणार आहे. हा उपक्रम महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवाचा आणि ग्रामीण उद्योजकतेचा अनोखा संगम घडवून गणेशोत्सवाला अविस्मरणीय स्वरूप देणार आहे.




*Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,*
*Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.*
*Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com * RNI NO : MAHMAR/2016/72091 * Postal Reg. No. THC/256/2022-2024*